सं.फौ.खटला क्र.३७/२४
सरकार / गोरख अर्जुन
निशाणी क्र.१२

साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – रविंद्र दत्तु लांडगे |
| वडीलांचे नाव | – दत्तु मल्हारी लांडगे |
| वय | – ३९ वर्षे |
| व्यवसाय | – काही नाही |
| राहणार | – आटपाडी , ता. आटपाडी, जि. सांगली. |

**<u>सरतपास सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१. दिनांक २९/०६/२०२३ रोजी पोलीसांनी मला कोठे बोलावले होते हे मला आठवत नाही. माझ्यासमक्ष पंचनामा केला व मुद्देमाल जप्त केला असे काही घडले नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर केवळ माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर मला माहिती नाही. पंचनाम्यावरील सहीस **<u>निशाणी क्र.PW1–13</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार त्याचे पुर्व कथनांशी विसंगत उत्तरे देत असल्यामुळे सरकारी वकीलांना उलटतपासामध्ये विचारण्यात येतील अशा स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९/०६/२०२३ रोजी पंचनाम्यासाठी आटपाडी बस स्टँडवर येथे पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे

म्हणणे खरे नाही की, हे म्हणणे खरे नाही की, आमच्या समक्ष पोलीसांनी आरोपीला नाव विचारले असता आरोपीने त्याचे नाव गोरख आबा अर्जुन असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आरोपीची अंगझडती घेतली. हे म्हणणे खरे नाही की, कशासाठी आले असे विचारले असता त्याने कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आरोपीस आमच्या समक्ष ताब्यात घेतले. हे म्हणणे खरे नाही की, दिसल्या परिस्थितीप्रमाणे पंचनामा केला व मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.व्ही. बी. ओलेकर यांनी नाकारला.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.12.08 11:26:24 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०६/१२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****